C.N.R. NO.**MHBU040009542010**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल दिनांक | : | ०१.१०.२०१० | | |
| नोंदणी दिनांक | : | ०१.१०.२०१० | | |
| निकाल दिनांक | : | ११.०३.२०२६ | | |
| कालावधी | : | व. | म. | दि. |
| | | १५ | ०५ | १० |

**निशाणी क्र. ६०**

**नमुना क्र. XXXII**

**भाग 'अ'**

**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**

**[फौजदारी नियमावली प्रकरण VI परिच्छेद 44(i)]**

| **अतिरिक्त सत्र न्यायाधीश, खामगांव, जिल्हा बुलढाणा येथील न्यायालयात**<br>**पीठासीन अधिकारी :- अमित प्र. कोकरे, अतिरिक्त सत्र न्यायाधीश** | |
|---|---|
| | न्यायनिर्णयाची तारीख :- ११/०३/२०२६.<br>**सत्र खटला क्र. ९५/२०१०**<br>**(जुना नियमित फौजदारी खटला क्र. १०६/२०१०)** |
| | प्रथम खबर/गुन्हा क्र. ४७/२०१०<br>हिवरखेड पोलीस स्टेशन. |
| फिर्यादी/<br>अभियोग पक्ष | **महाराष्ट्र सरकार तर्फे हिवरखेड पोलीस स्टेशन,**<br>तालुका खामगाव, जिल्हा बुलढाणा. |
| प्रतिनिधीत्व करणार | विद्वान सरकारी अभियोक्ता श्री एस.बी.इंगळे |
| आरोपी | **१. मंगेश मेरुलाल शिंदे**<br>वय – १९ वर्षे, व्यवसाय– मजुरी/म्हशी पालन<br>**२. भिमा लाला बाबर**<br>वय – ३० वर्षे, व्यवसाय– मजुरी |

| | |
|---|---|
| | **३. सुनिता लंगडया उर्फ देवचंद शिंदे**<br>वय –१९ वर्षे, व्यवसाय – मजुरी<br>राहणार – शिराळा तालुका खामगाव, जिल्हा – बुलढाणा |
| प्रतिनिधीत्व करणार | आरोपींकरीता विद्वान विधीज्ञ श्री. एम.पी.वाकोडे |

**भाग 'ब'**

**[फौजदारी नियमावली प्रकरण VI परिच्छेद 44(ii )]**

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | १३/०६/२०१० |
| प्रथम खबर तारीख | १९/०६/२०१० |
| आरोपपत्र दाखल केल्याची तारीख | १३/०९/२०१० |
| दोषारोप निश्चित केल्याची तारीख | १८/११/२०१३ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख. | २८/०१/२०२६ |
| ज्या दिवशी न्यायनिर्णय राखून ठेवला आहे, ती तारीख | १०/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ११/०३/२०२६. |

| | |
|---|---|
| शिक्षा दिली असल्यास शिक्षेची तारीख | लागू नाही. |

## आरोपीची माहिती

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | गुन्हे दाखल | निर्दोष ठरविले की दोषी ठरविले | ठोठावलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम 428 च्या उद्देशाने खटल्यादरम्यान अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **मंगेश मेरुलाल शिंदे** | १४/०३/२०१० | २८/०३/२०१० | भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३६३/५११, ३६६/५११ सह कलम ३४ अन्वये. | निर्दोष. | लागू नाही. | लागू नाही. |
| २. | **भिमा लाला बाबर** | १४/०३/२०१० | २८/०३/२०१० | भारतीय दंड विधान, ३६३/५११, ३६६/५११ सह कलम ३४ अन्वये. | निर्दोष. | लागू नाही. | लागू नाही. |
| ३. | **सुनिता लंगडया उर्फ देवचंद शिंदे** | १४/०३/२०१० | २८/०३/२०१० | भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३६३/५११, ३६६/५११ सह कलम ३४ अन्वये. | निर्दोष. | लागू नाही. | लागू नाही. |

**भाग 'ब'**

[फौजदारी नियमावली प्रकरण VI परिच्छेद 44(iii)]

## अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयाचे साक्षीदार यांची यादी

### अ. अभियोग पक्षाचे साक्षीदार :

| क्रमांक | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| PW-1 | भाऊराव रंगराव साळुंके (नि क्र.४३ ) | फिर्यादी |
| PW-2 | कल्पना भाऊराव साळुंके (निशाणी क्र.४६ ) | प्रत्यक्ष साक्षीदार |
| PW-3 | रामा त्र्यंबक पंखुले (निशाणी क्र.४८) | घटनास्थळ पंच |
| PW-4 | श्रीराम सदाशिव कारंडे(निशाणी क्र.५० ) | घटनास्थळ पंच |
| PW-5 | रेणुका भाऊराव साळुंके (निशाणी क्र.५१ ) | पीडिता |

### ब. बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यास :

| क्रमांक | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | कोणी नाही. | -- |

### क. न्यायालयाचे साक्षीदार, असल्यास :

| क्रमांक | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | कोणी नाही. | -- |

## अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयाची निशाणी क्रमांकाची यादी

अ. अभियोग पक्षातर्फे निशाणी क्रमांक :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र. ४४ | रिपोर्ट |
| २. | निशाणी क्र. ४५ | छापील एफआयआर |
| ३. | निशाणी क्र.४९ | घटनास्थळ पंचनामा (सहीपुरता) |
| ४. | निशाणी क्र. ५३ व ५४ | पंचांच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रत |

ब. बचाव पक्षातर्फे निशाणी क्रमांक :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| | -- | -- |

क. न्यायालयातर्फे निशाणी क्रमांक :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| | -- | -- |

ड. भौतिक वस्तू (Material Objects) :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | एमओ-१ | चाकू |

## न्यायनिर्णय

**(दिनांक – ११ मार्च, २०२६ रोजी पारित)**

आरोपी क्र. १ ते ३ हे भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३६३/५११, ३६६/५११ सह कलम ३४ नुसार शिक्षा पात्र गुन्ह्याच्या संपरिक्षेचा सामना

करीत आहेत.

२. या प्रकरणाची पार्श्वभूमी अशी की, दि. १४.०६.२०१० चे एक महिन्यापूर्वी कामिनीबाई मेरुलाल शिंदे व शोभा अमृता सनिसे हे फिर्यादी भाऊराव (निशाणी ४४ ) यांचेकडे त्यांची मुलगी साक्षीदार क्र. ५ रेणूका (निशाणी ५१) हिचेसोबत कामीनीबाई यांचा मुलगा आरोपी क्र. १ मंगेश याचेसोबत लग्नाची मागणी करण्याकरिता आले होते. परंतु फिर्यादीने रेणुका (निशाणी ५१)हि लहान असल्याने सध्या लग्न करायचे नाही असे सांगितले होते. त्यानंतर फिर्यादी नागपूर येथे निघून गेला होता.

३. दि. १४.०६.२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता फिर्यादी नागपूर येथून परत आला. त्यावेळेस फिर्यादीची पत्नी साक्षीदार क्र. २ कल्पना (निशाणी ४६) हिने सांगितले की, ती व साक्षीदार क्र. ५ रेणूका (निशाणी ५१) दि. १३.०६.२०१० रोजी संध्याकाळी ०७.०० वाजता प्रात्यविधीसाठी गेले असता गोदरीमध्ये आरोपी क्र. १ मंगेश, आरोपी क्र. २ भीमा व आरोपी क्र. ३ सुनिता हे हजर होते व त्यांनी रेणुका हिला पकडले. आरोपी क्र. १ मंगेश याने रेणुकाचे तोंड दाबले व आरोपी क्र. २ भीमा याने चाकुचे धाक दाखवला. आरोपी क्र.३ सुनिता ही रेणुकाला तु आमच्यासोबत चल, तुझ लग्न आरोपी क्र. १ मंगेश याच्यासोबत लावून देते असे म्हणाली. अशा प्रकारे आरोपी क्र. १ ते ३ रेणुकाला पळवून घेवून जात होते. त्यावेळेस साक्षीदार क्र. २ कल्पना (निशाणी ४६) हिने आरडाओरडा केला म्हणून आरोपी तेथून पळून गेले.

४. त्यामुळे फिर्यादीने गावातील लोकांकडे विचारपूस करुन आरोपींना समजावण्याचा प्रयत्न केला परंतु आरोपींनी मुलगी रेणुका हिला पळवून नेवू व

आरोपी क्र.१ मंगेश सोबत लग्न लावून देवू असे ठणकावून सांगितले. सबब भविष्यात पुन्हा मुलगी रेणुका हिला पळवून नेण्याची शक्यता वाटल्याने फिर्यादीने दिनांक १९.०६.२०१० रोजी हिवरखेड पोलीस स्टेशन येथे तोंडी रिपोर्ट (निशाणी ४४) दिला.

**५.** रिपोर्ट (निशाणी ४४) वरुन दि. १९/०६/२०१० रोजी गुन्हा रजिस्टर नं ४७/१० भादवि कलम ३६३/५११, ३६६/५११ सह कलम ३४ प्रमाणे दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास एएसआय पुरुषोत्तम जोशी यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळी जाऊन घटनास्थळाचा पंचनामा पंचांसमक्ष तयार केला. साक्षीदारांचे जबाब त्यांनी सांगितल्याप्रमाणे नोंदवले. आरोपींना अटक केली.तपासाअंती आरोपींविरुद्ध उपरोक्त अपराधासंदर्भात विद्वान न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग खामगाव (कोर्ट नंबर २) यांच्या समोर दोषारोपपत्र दाखल केले.

**६.** विद्वान न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग खामगाव (कोर्ट नंबर २) यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०७ मधील तरतूदींची पूर्तता करुन कलम २०९ मधील तरतूदींनुसार अभिकथीत अपराध भा.दं.वि. कलम ३६३/५११, ३६६/५११ सह कलम ३४ केवळ सत्र न्यायालयाच्या अधिकारकक्षेत येत असल्याने प्रकरण संप्रेषित केले.

**७.** आरोपीं विरुध्द माझे माननीय पूर्व पिठासीन अधिकारी यांनी भा.दं.वि. कलम ३६३/५११, ३६६/५११ खालील अपराध केला असा दोषारोप (निशाणी क्र. २४) निश्चित केला. आरोपींनी सदर अपराध कबूल नाही असे निवेदन (निशाणी क्र. २५ ते २७) द्वारे दिले.

८. आरोपीविरुध्दचा गुन्हा सिद्ध करण्याकरिता अभियोग पक्षाने एकूण पाच साक्षीदार तपासले आहेत. त्यानंतर अभियोग पक्षाने पुरसीस (निशाणी ५५अ) दाखल करुन अभियोग पक्षाचा पुरावा संपल्याचे कळविले आहे.

९. खटल्यातील तथ्य पाहता, माझ्यापुढे खालील मुद्दे उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष मी खालील कारणांच्या आधारे नोंदवित आहे.

| अ. क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, दि. १३.०६.२०१० रोजी रात्री ०७.०० वाजेच्या दरम्यान शिराळा येथील प्रात्यविधीसाठी गेले असता गोदरीमध्ये फिर्यादीचे कायदेशीर पालकत्वातून पीडितेचे अपहरण करण्याचा प्रयत्न केला व अशाप्रकारे भादवि कलम ३६३/५११ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला? | **नाही** |
| २. | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, वर नमुद तारीख वेळ व ठिकाणी आरोपींनी पिडीतेला गुन्हेगारी धमकी देवून किंवा जबरदस्तीने, घरातून जाण्यास प्रवृत्त केले व तिला जबरदस्तीने लग्न करावे लागेल हे जाणून किंवा तिला बेकायदेशीर संभोग करण्यास भाग पाडले जाईल किंवा फसवले जाईल हे जाणून फुस लावून अपहरण करण्याचा प्रयत्न केला व अशाप्रकारे भादवि कलम ३६६/५११ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला? | **नाही** |
| ३. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र. १ ते ३ बाबत :–**

**१०.** सर्व अपराध हे एकमेकांशी संलग्न असल्याने आणि एकाच घटनेमधून उत्पन्न झाले असल्याने उपरोक्त सर्व मुद्यांचे निष्कर्ष काढण्यासाठी उपलब्ध पुरावा एकाच ठिकाणी विचारात घेणे सोयीस्कर आहे.

**११.** अभिलेख पडताळले. अभियोग पक्षातर्फे विद्वान सरकारी अभियोक्ता श्री. एस.बी.इंगळे व आरोपींतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.एम.पी.वाकोडे यांचा युक्तीवाद ऐकला.

**१२.** साक्षीदार क्र. ३ रामा पंखुले (निशाणी ४८) व साक्षीदार क्र. ४ श्रीराम कारंडे (निशाणी ५०) हे घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच साक्षीदार आहेत. या दोघांनीही पुराव्यामध्ये अभियोग पक्षाच्या कथनास पाठिंबा दिलेला नाही. अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात देखील आरोपींविरुद्ध गुन्हा सिद्ध होईल असा आक्षेपार्ह पुरावा अभिलेखावर आलेला नाही. या क्षणी हे देखील नमुद करणे आवश्यक आहे की, कथित घटना ही दिंनाक १३.०६.२०१० रोजीची आहे व घटनास्थळ पंचनामा हा २०.०६.२०१० रोजीचा आहे. सबब घटनास्थळ पंचनाम्यास महत्व प्राप्त होत नाही.

**१३.** भारतीय पुरावा कायदा कलम २७ प्रमाणे केलेल्या चाकू (एमओ–१) जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदारांचा पुरावा अभियोग पक्षाने नोंदवलेला नाही. तसेच अभियोग पक्षाने तपास अधिकारी यांचा पुरावा देखील नोंदवलेला

नाही. त्यामुळे चाकू जप्ती ही सिद्ध होत नाही. तसेच साक्षीदार क्र. ५ मुलगी रेणूका (निशाणी ५१) हिने उलटतपासात तिच्या आईने चाकू (एमओ–१) पोलीसांना दिला होता ही सुचना आरोपीतर्फे दिली असता स्वतःहून सांगितले आहे की, चाकू एमओ–१ हा तिने पोलीसांना दिला होता. सबब चाकू जप्ती बाबत संशय निर्माण होतो. त्यामुळे अभियोग पक्ष चाकू जप्ती पंचनामा सिद्ध करु शकलेला नाही.

**१४.** फिर्यादी साक्षीदार क्र. १ भाऊराव (निशाणी ४३) यांनी पुराव्यात रिपोर्ट (निशाणी ४४) ही सिद्ध केली असून त्याप्रमाणे पुरावा दिलेला आहे. एकंदर रिपोर्ट (निशाणी ४४) व फिर्यादीच्या पुराव्याचे अवलोकन केल असता फिर्यादी हा घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही. घटना ही त्याच्या समक्ष घडलेली नाही. त्याची कथित घटनेबाबतची माहिती ही पत्नी साक्षीदार क्र. २ कल्पना (निशाणी ४६) हिचे कडून प्राप्त झाली आहे. सबब फिर्यादीचा पुरावा हा ऐकिव स्वरुपाचा आहे व केवळ त्या आधारे आरोपींविरुद्ध गुन्हा सिद्ध होत नाही.

**१५.** घटनेच्या महत्वूपर्ण साक्षीदार या फिर्यादीच्या पत्नी साक्षीदार क्र. २ कल्पना (निशाणी ४६) व मुलगी साक्षीदार क्र. ५ रेणुका (निशाणी ५१) आहेत. साक्षीदार क्र. २ कल्पना हिने पुराव्यात घटना १० ते १५ वर्षापूर्वी संध्याकाळी ०६.०० वाजता घडल्याचे व त्यावेळेस मुलगी रेणुका हिला आरोपी तोंड बांधून घेवून चालले असल्याचे व त्यांच्या जवळ चाकू असल्याचे सांगितले आहे. तिने जप्त चाकू पुराव्यात ओळखला आहे. तिने पुराव्यात या व्यतिरिक्त काही सांगितलेले नाही. सबब या महत्वपुर्ण साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता घटना कुठे घडली म्हणजेच घटनास्थळ काय आहे हे तिने सांगितलेले

नाही. आरोपी क्र. १ मंगेश सोबत लग्न लावून देण्याच्या उद्देशाने घटना घडली असे या साक्षीदाराने सांगितलेले नाही. आरडा ओरडा केल्याचे, आरोपी पळून गेल्याचे या साक्षीदाराने सांगितलेले नाही. सबब या साक्षीदाराचा पुराव्यामध्ये गुन्हयांचा तपशील सिद्ध करण्याइतपत आक्षेपार्ह पुरावा आढळून येत नाही. तसेच उलटतपासामध्ये या साक्षीदाराने मान्य केले आहे की, घटनास्थळी आजूबाजूला घरे आहेत व जोरात ओरडले तरी लोक जमा होतात. तसेच तिने मान्य केले आहे की तिच्या जबाबातील मजकूर फिर्यादीने पोलीसांना सांगितला होता. सबब या साक्षीदाराचा पुरावा आरोपींविरुद्ध संशयापलीकडे जावून गुन्हा सिद्ध होण्यासाठी उपयुक्त ठरत नाही.

**१६.** साक्षीदार क्र. ५ रेणुका (निशाणी ५१) हिने पुराव्यात घटना रात्री ०७.०० वाजता नारायण वायसे यांच्या शेतात घडल्याचे सांगितले आहे. त्यावेळेस आरोपी क्र. १ मंगेश याने तोंड दाबल्याचे, आरोपी क्र. २ भीमा याने चाकू लावल्याचे व आरोपी क्र. ३ सुनिता हिने चल तुझे मंगेश सोबत लग्न लावू असे म्हणाल्याचे सांगितले आहे. पुढे या साक्षीदाराने पुराव्यात असे सांगितले आहे की, तिने आरडाओरडा केल्यानंतर लोक जमा झाले होते. परंतु अभियोग पक्षाने कोणत्याही त्रयस्थ साक्षीदारांचा पुरावा नोंदवलेला नाही.

**१७.** अशा परिस्थितीत उलटतपासात फिर्यादी, पत्नी व मुलगी यांनी मान्य केलेल्या बाबींना महत्व प्राप्त होते. त्यांनी उलटतपासात मान्य केले आहे की, घटनेच्या अगोदरपासून आरोपींसोबत वाद होते व पटत नव्हते. फिर्याद (निशाणी ४४) मध्येच नमूद आहे की, फिर्यादीने आजूबाजूच्या लोकांकडे

घटनेबाबत विचारपूस केली होती. परंतु त्यापैकी कोणाचाही पुरावा अभियोग पक्षाने नोंदवलेला नाही. त्यामुळे प्राप्त परिस्थितीत फिर्यादी, पत्नी व मुलगी हे आरोपींना शिक्षा होण्यास स्वारस्य असलेले साक्षीदार ठरतात.

**१८.** तसेच सर्वांत महत्वपूर्ण बाब म्हणजे कथित घटना ही १३.०६.२०१० रोजीची आहे. त्यादिवशी घटनेचे कथित प्रत्यक्षदर्शी साक्षीदार पत्नी कल्पना व मुलगी रेणुका यांनी कोणतीही फिर्याद पोलीस स्टेशनला दिलेली नाही. पत्नी हिने उलटतपासात मान्य केले आहे की, घटनेबाबत गावतील सरपंच, पोलीस पाटील यांना सांगितले होते. परंतु या साक्षीदारांचा पुरावा अभियोग पक्षाने नोंदवलेला नाही. त्यानंतर दुस-या दिवशी दि. १४.०६.२०१० रोजी फिर्यादीस तो नागपूर वरुन आल्यानंतर घटनेबाबत सांगितल्याचे कथन आहे. मात्र तरीदेखील लगेच दि.१४.०६.२०१० रोजी कोणतीही फिर्याद देण्यात आली नसल्याचे दिसून येते. तोंडी रिपोर्ट (निशाणी ४४) चे अवलोकन केले असता तो दि. १९.०६.२०१० रोजी नोंदवण्यात आला आहे. सबब रिपोर्ट नोंदवण्यास उशीर का झाला आहे याचे कोणतेही कारण अभियोग पक्षातर्फे अभिलेखावर स्पष्ट करण्यात आलेले नाही. फिर्यादी, पत्नी व मुलगी यांनी पुराव्यात आरोपी भविष्यात पुन्हा मुलीला पळवून नेण्याची शक्यता आहे असे सांगितलेले नाही. त्यामुळे तोंडी रिपोर्ट (निशाणी ४४) व साक्षीदारांचा पुरावा यामध्ये याबाबत तफावत असल्याचे दिसून येते. कोणत्या लोकांकडे फिर्यादीने विचारपूस केली होती त्यांची नावे फिर्यादीने सांगितलेली नाहीत. तसेच त्यांचा पुरावा अभियोग पक्षाने नोंदवलेला नाही.

**१९.** अजून एक महत्वपूर्ण बाब म्हणजे घटनेच्या वेळेस पीडितेचे वय किती होते याबाबतचा कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सबब घटनेच्या वेळेस पीडितेचे वय हे १८ वर्षाखाली होते हे सिद्ध होत नाही.

**२०.** सबब वरील चर्चा व विवेचनानुसार अभियोग पक्ष आरोपींनी पीडितेला फुस लावून पळवून नेण्याचा प्रयत्न केला तसेच आरोपींनी फिर्यादीच्या कायदेशीर पालकत्वातून पीडितेचे लग्नाचे आमिष दाखवून जबरदस्तीने लग्न करण्यासाठी अपहरण करण्याचा प्रयत्न केला असे सिद्ध करण्यास अपयशी ठरतो. तसेच आरोपींनी विना संमतीने अथवा जबरदस्तीने पीडितेला त्यांच्यासोबत नेण्याचा प्रयत्न केला अथवा नेण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न केला तसेच आरोपींनी अठरा वर्षाखालील अल्पवयीन पीडितेला दुस–या व्यक्तीसोबत बेकायदेशीर संबंध ठेवण्यास भाग पाडण्याच्या हेतूने अथवा माहितीने कुठेतरी जाण्यास किंवा काहीतरी करण्यास प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला, असे सिद्ध होत नाही.

**२१.** सबब कलम ३६३/५११ व ३६६/५११ सह कलम ३४ चे घटक सिद्ध होत नाहीत. अशा परिस्थितीत, आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३६३/५११, ३६६/५११ सह कलम ३४ नुसार दोषारोप सिध्द होण्यासाठी संशयापलीकडे जावून सिध्द होणारा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे आरोपींची निर्दोष मुक्तता होण्यास ते पात्र ठरतात. **सबब मी मुद्दे क्र. १ व २ चे उत्तर नकारार्थी देत आहे आणि मुद्दा क्र. ३ चे उत्तराकरिता मी खालील आदेश पारीत करीत आहे.**

# आदेश

१) आरोपी क्र.१ **मंगेश मेरुलाल शिंदे** आरोपी क्र.२ **भिमा लाला बाबर** आरोपी क्र.३ **सुनिता लंगडया उर्फ देवचंद शिंदे** याची प्रस्तुतच्या खटल्यातून भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३६३/५११,३६६/५११ सह कलम ३४ अन्वये शिक्षा असलेल्या आरोपातून फौजदारी प्रक्रीया संहीतेचे कलम २३५(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपींचे स्वबंधपत्र आणि जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत.

३) न्यायालयाच्या सदरच्या न्यायनिर्णयाविरुध्द अपील दाखल झाल्यास जेव्हा केव्हा माननीय उच्च न्यायालय नोटीस देईल, तेव्हा न्यायालयासमोर उपस्थित राहण्याकरीता आरोपींनी फौजदारी प्रक्रीया संहीतेच्या कलम ४३७–अ प्रमाणे प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/– चे बंधपत्रासह जमानतपत्र द्यावयाचे आहे. सदरच्या जमानतपत्राचा अंमल सहा महिन्यांकरीता राहील.

४) दोषारोपपत्रानुसार जप्त मुद्देमाल अनुक्रमांक एक आड जुना वापरता चाकु(एमओ १) लांबी १० इंच पाते ६ इंच मुठ लालसर रंगाचा मुल्य शुन्य हा जप्त करण्यात येतो व जिल्हा दंडाधिकारी यांना अपील कालावधी संपल्यानंतर कायदयाप्रमाणे विल्हेवाट लावण्याकरिता पाठविण्यात यावा.

AMIT PRALHAD KOKARE
Digitally signed by AMIT PRALHAD KOKARE
Date: 2026.03.12 16:11:58 +0530

खामगांव.
दिनांक – ११/०३/२०२६.

(**अमित प्र. कोकरे**)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
खामगांव.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी खात्रीपूर्वक असे कथन करते की, पी.डी.एफ. फाईल मधील न्यायनिर्णय हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | :- | अतिरिक्त सत्र न्यायाधीश, खामगांव. |
| लघुलेखिकेचे नांव | :- | कु. राधिका अनिल पाटील कनिष्ठ लिपिक |
| न्यायनिर्णय पारीत केल्याचा दिनांक | :- | ११/०३/२०२६. |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | :- | १२/०३/२०२६. |